# सूचना

## महाराष्ट्र शासन - वनविभाग

### वनरक्षक भरती २०१६ (महिला / पुरुष) उमेदवार यांची शारीरीक क्षमता चाचणी (चालणे)

१. वनरक्षक पदासाठीच्या निवड सुचीतील सर्व उमेदवारांनी दिनांक २७.०४.२०१७ रोजी वनक्षेत्रपाल मलकापूर यांचे कार्यालयासमोर सकाळी ठिक ६.०० वाजता उपस्थित रहावे.

२. वनक्षेत्रपाल मलकापूर यांचे कार्यालय तहसिलदार शाहूवाडी यांचे कार्यालयाजवळ आहे.

३. यासाठी उमेदवारांनी "शाहूवाडी" या एस.टी. थांब्यावर उतरावे. शाहूवाडी येथे जाणेसाठी मध्यवर्ती बसस्थानक कोल्हापूर येथून मलकापूरला जाणा-या सर्व बसगाड्या तसेच रत्नागिरीकडे जाणा-या सर्व बसगाड्या या थांब्यावर थांबतात.

४. वनक्षेत्रपाल मलकापूर (शाहूवाडी) यांचे कार्यालयापासून ते चाचणी ठिकाण उदगिरी रोड (हडक्याचा माळ) येथ पर्यंत उमेदवारांना बसने नेण्याची व्यवस्था वनविभागामार्फत करण्यात आलेली आहे.

५. बसमध्ये फक्त उमेदवारांनाच बसण्याची परवानगी असणार आहे. उमेदवारांच्या पालकांना / नातेवाईकांना बसमध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

६. तत्पुर्वी उमेदवारांनी दिनांक २७.४.२०१७ रोजीच्या शारीरीक क्षमता चाचणी (चालणे) संदर्भात सूचना प्राप्त करुन घेण्यासाठी दिनांक २६.४.२०१७ रोजी ठिक दुपारी ३.०० वाजता मुख्य वनसंरक्षक (प्रा.) कोल्हापूर यांचे कार्यालयाचे सभागृहात न चुकता उपस्थित राहणेचे आहे.

७. पुरुष उमेदवारांनी २५ कि.मी. चालण्याची चाचणी ४ तासामध्ये पूर्ण करणे अनिवार्य आहे. तसेच महिला उमेदवारांनी १६ कि.मी. चालण्याची चाचणी ४ तासामध्ये पूर्ण करणे अनिवार्य आहे.

८. महिला व पुरुष उमेदवारांनी वनक्षेत्रपाल मलकापूर कार्यालयात ठेवण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये आपले दिनांक २७.४.२०१७ रोजीचे उपस्थिती बाबत व वरील सूचना समजलेबाबत स्वाक्षरी करण्याची आहे.

९. उमेदवारांनी कोणत्याही प्रकारच्या वाहनांची / इतर साधनांची / व्यक्तींची मदत न घेता चालण्याची चाचणी मुदतीत पूर्ण करावयाची आहे. गैरप्रकार केल्याचे आढळल्यास उमेदवारास अपात्र ठरवण्यात येईल याची नोंद घ्यावी.

१०. उमेदवार यांची शारीरीक क्षमता चाचणी (चालण्याची चाचणी) कोल्हापूर वनविभागातील, मलकापूर वनपरिक्षेत्रातील उदगिरी रोडवर (हडक्याचा माळ) येथे ठिक सकाळी ७.०० वाजता सुरु होणार असलेने, उमेदवारांनी न चुकता चाचणीचे ठिकाणी उपस्थित रहावे. शाहूवाडी ते हडक्याचा माळ येथ पर्यंत वाहनाने जाणेसाठी साधारण एक तासाचा वेळ लागतो.

११. सदर चाचणीकरीता येतेवेळी मुळ आधारकार्ड / ओळखपत्र व त्याची स्वाक्षांकीत केलेली छायांकीत प्रत सोबत आणावी.

स्वाक्षरी/-
सदस्य सचिव
प्रादेशिक निवड समिती
तथा उप वनसंरक्षक,
सातारा वनविभाग, सातारा



Scanned by CamScanner

# घोषणापत्र

मी श्री. /श्रीमती / कुमारी ----------------------------------------
चेस्ट क्रमांक ------------------------ मु.पो.-------------------------
ता.--------------------------------- जि.--------------------------------
मोबाईल नंबर ---------------------------- बंधपत्र लिहून देतो / देते की, सन २०१६ चे वनरक्षक भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने माझे नांव निवडसूचीत अंतर्भूत आहे. त्या अनुषंगाने वनविभागामार्फत दि.२७.०४.२०१७ रोजी चालण्याची शारीरीक क्षमता चाचणी (पुरुष उमेदवारांनी २५ कि.मी. / महिला उमेदवारांनी १६ कि.मी. चालण्याची चाचणी ४ तासामध्ये पूर्ण करणे अनिवार्य) आयोजित केली आहे. सदर चाचणीसाठी मी शारीरीकदृष्ट्या तंदुरुस्त आहे. सदर चाचणी मी स्वत:चे जबाबदारीवर पूर्ण करत आहे. चाचणी दरम्यान मला काहीही शारिरीक इजा / त्रास झाल्यास त्यास मी वैयक्तिक जबाबदार राहीन. त्याबाबत मी शासनांस कोणतीही तोशीष लागू देणार नाही. सदर चाचणी बाबत दि.२६.०४.२०१७ रोजी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) कोल्हापूर कार्यालय येथे मला समक्ष सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्या अनुषंगाने कार्यालयात ठेवण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये माझी उपस्थिती व सूचना प्राप्त झाल्याबाबत मी स्वाक्षरी केली आहे.

कोल्हापूर

दि.२६.०४.२०१७ ( )



Scanned by CamScanner